

दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com



वर्ष : ०६ | अंक : ८४, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.०६ नोव्हेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

तुकाराम मुंढेंचा दणका! महाराष्ट्रात रोजच्या संकलनातून लाखो लिटर दूध गायब

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.०५, पुणे : दूध भेसळीच्या गोरख धंद्याला अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) कारवाईमुळे जोरदार दणका बसला असून, या मोहिमेमुळे राज्यातील दैनंदिन दूध संकलनात घट नोंदवली गेली आहे. 'एफडीए'चे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी भेसळयुक्त दुधाविरोधात धडक म ोहीम सुरू केल्यानंतर राज्यातील रोजच्या दूध संकलनात गेल्या सात महिन्यांत तब्बल १८.८३ लाख लिटरची, म्हणजेच १०.४५ टक्क्यांची घट झाली आहे.

जानेवारीत रोज १.८० कोटी लिटर असलेले संकलन ऑगस्टमध्ये १.६१ कोटी लिटरवर आले आहे. दुग्धव्यवसाय विकास विभागाचे आयुक्त प्रशांत मोहोड यांनी दिलेल्या आकडेवारीतून ही बाब समोर आली आहे. सप्टेंबरमध्ये दूध संकलनात किंचित वाढ झाली असली, तरी जानेवारीच्या तुलनेत रोजची घट अद्याप १७.४१ लाख लिटर आहे.

'एफडीए'चे आयुक्त म्हणून मुंढे यांनी मे महिन्यात सूत्रे स्वीकारल्यानंतर जूनच्या पहिल्याच आठवड्यात भेसळयुक्त दुधाविरोधात कठोर कारवाई सुरू केली. 'एफडीए' आणि पोलिसांनी संयुक्त मोहीम राबवून पुणे (मंचर), सोलापूर, जालना, ठाणे आणि जळगाव या जिल्ह्यांमध्ये भेसळयुक्त दुधावर छापे टाकले होते. याम ध्ये शाम्पू, इंडस्ट्रियल केमिकल आणि इमल्सिफायर वापरून बनवल्या जाणाऱ्या रासायनिक व बनावट दुधाचे मोठे रॅकेट उद्ध्वस्त करण्यात आले. दूध भेसळ करणारे, बेकायदा प्रक्रिया केंद्रे आणि गैरव्यवहारांवर कारवाई झाल्यानंतर हा गोरख धंदा करणाऱ्यांचे धाबे दणाणले.



दुग्धव्यवसाय विकास विभागाच्या आकडेवारीनुसार, यंदा जानेवारीत राज्यातील सहकारी आणि खासगी दूध प्रकल्पांचे एकत्रित दैनंदिन संकलन १.८० कोटी लिटर होते. फेब्रुवारीमध्ये ते १.७९ कोटी लिटर, तर मार्चमध्ये १.७५ कोटी लिटर झाले. एप्रिल आणि मे महिन्यांत ते १.७९ कोटी लिटरच्या आसपास होते. मात्र, जूनमध्ये 'एफडीए'ची कारवाई तीव्र झाल्यानंतर संकलन १.७२ कोटी लिटरपर्यंत कमी झाले. एका महिन्यातच रोजच्या संकलनात ७.५२ लाख लिटरची घट झाली. जुलैमध्ये, १.६४ कोटी लिटर, ऑगस्टमध्ये १.६१ कोटी लिटर, आणि सप्टेंबरमध्ये संकलन १.६३ कोटी लिटर दूध संकलन झाले.

ऑगस्टमध्ये नीचांकी संकलन

ऑगस्ट महिन्यात एक कोटी ६१ लाख ४० हजार दूध संकलन झाले असून, या वर्षातील आतापर्यंतचे सर्वाधिक कमी दूध संकलनाचा महिना ठरला आहे. सप्टेंबरमध्ये दैनंदिन संकलनात १.४२ लाख लिटरची वाढ झाली. मात्र, जानेवारीच्या तुलनेत रोज १७.४१ लाख लिटर कमी दूध संकलित होत आहे.

दरम्यान, भेसळ करणारे दूध संकलन केंद्र ते डेअरी अशा ठिकाणांवर कारवाई केली गेली. भेसळयुक्त दुधाचे रॅकेट उद्ध्वस्त करण्यात आले. त्यासाठी वापरण्यात येणारे स्किम्ड मिल्क पावडरचे प्रमाण कमी झाले आहे. त्यातच ॲनालॉग पनीरवर कारवाई केल्याने चांगल्या पनीरसाठी शुद्ध दुधाची मागणी वाढली. त्यामुळे दुधाच्या संकलनावर थेट परिणाम दिसतो आहे.

यामुळे शेतकऱ्यांनाही थेट फायदा होत असून, भविष्यात भेसळयुक्त दुधावर कारवाई सुरूच राहील, अशी माहिती एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिली आहे.

येवल्याच्या राजकारणात खळबळ!

आ.सुहास कांदे यांच्या दिवाळी शुभेच्छांच्या होर्डिंग्जमुळे चर्चेला उधाण

अक्षराज : सुनील क्षिरसागर

दि.०५, विंचूर (नाशिक) : राजकारणात नेत्यांचे पाऊल, गावांमधील उपस्थिती आणि संपर्क नेहमीच मोठ्या राजकीय अर्थामागे लपलेला असतो. सध्या येवला विधानसभा मतदारसंघात अशाच एका चर्चेने जोर धरला आहे. नांदगावचे शिवसेना आमदार सुहास कांदे यांनी दीपावलीच्या निमित्ताने येवला मतदारसंघातील सर्वच गावांमध्ये शुभेच्छांचे होर्डिंग लावल्याने राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू झाली आहे. ही केवळ सणानिमित्त दिलेली सदिच्छा भेट आहे की येवल्याच्या राजकारणात पाय पसरण्याचा प्रयत्न? याबद्दल उलट-सुलट तर्क-वितर्क लढवले जात आहेत.

छगन भुजबळ विरुद्ध सुहास कांदे : राजकीय संघर्ष आणि जुनी समीकरणे

आमदार सुहास कांदे आणि मंत्री छगन भुजबळ यांच्यातील मतभेद सर्वश्रुत आहेत. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत नांदगाव मतदारसंघात कांदे यांच्याविरोधात छगन भुजबळ यांचे पुतणे समीर भुजबळ यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवली होती. या निवडणुकीत आ. कांदे यांनी १ लाख ३८ हजार ६८ म तांपेक्षा अधिक मते मिळवून समीर भुजबळ यांचा मोठ्या मताधिक्याने पराभव केला होता (समीर भुजबळ यांना ४८,१९४ मते मिळाली). त्यावेळीही कांदे येवल्यातून निवडणूक लढवणार असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या.

दुसरीकडे, छगन भुजबळ यांनी २०२४ च्या निवडणुकीत येवला मतदारसंघातून सुमारे १ लाख ३५ हजार मते मिळवत आपला गड यशस्वीपणे राखला. २००४ पासून या मतदारसंघावर सातत्याने वर्चस्व राखणारे भुजबळ यांच्यासाठी येवला हा केवळ एक म तदारसंघ नसून त्यांच्या राजकीय नेतृत्वाचा मुख्य आधार आहे.



'माधव पॅटर्न', वंजारी समाज आणि कुणाल दराडे यांची भूमिका...

येवल्याच्या राजकारणात ओबीसी मतांचे समीकरण अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे. माळी, धनगर आणि वंजारी (माधव पॅटर्न) या तीन प्रमुख ओबीसी घटकांच्या एकजुटीला राजकीय ताकद देण्याचे काम मंत्री छगन भुजबळ यांनी केले आहे. मात्र, सध्या येवल्यात वंजारी समाजातून पुढे येणाऱ्या नेतृत्वाकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे.

आमदार नरेंद्र दराडे यांचे पुत्र कुणाल दराडे यांनी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत येवल्यातून उम ेदवारी अर्ज दाखल केला होता. कुणाल दराडे यांच्या वाढत्या राजकीय महत्त्वाकांक्षेमुळे येवल्यात स्वतंत्र राजकीय हालचालींना वेग आला आहे. कुणाल दराडे यांचे राजकीय बळ वाढल्यास येथील ओबीसी आणि वंजारी समाजाच्या नेतृत्वाच्या समीकरणाला नवी दिशा मिळू शकते.

कांदे यांच्या होर्डिंगमागे नेमका संदेश काय?

भुजबळांशी असलेले जुने मतभेद, येवल्यातील ओबीसी राजकारण आणि दराडे कुटुंबाच्या माध्यमातून पुढे येणारे नवे नेतृत्व या तिहेरी पार्श्वभूमीवर आ. सुहास कांदे यांनी येवल्यात लावलेले होर्डिंग अत्यंत सूचक मानले जात आहेत. दुसऱ्या मतदारसंघातील आमदाराने अशा प्रकारे पारंपरिक प्रभावाच्या क्षेत्रात दृश्य उपस्थिती निर्माण करणे राजकीयदृष्ट्या लक्षवेधी ठरत आहे. मात्र, यावरून कांदे येवल्यातून थेट निवडणूक लढवणार की अन्य कोणाला राजकीय पाठबळ देणार, हे अद्याप स्पष्ट झाले नसले तरी या होर्डिंग्जमुळे येथील राजकीय तापम ान नक्कीच वाढले आहे.

भुजबळांच्या ओबीसी नेतृत्वासमोर नवे आव्हान?

मंत्री छगन भुजबळ यांचे राजकारण केवळ येवल्यापुरते मर्यादित नसून ते राज्यपातळीवरील ओबीसी नेतृत्वाचा चेहरा आहेत. अशा स्थितीत येवल्यात वंजारी समाजातील नेतृत्वाचा उदय, दराडे कुटुंबाची वाढती सक्रियता आणि सुहास कांदे यांची एन्ट्री या सर्व बाबींमुळे भुजबळांसमोर आगामी काळात नवी राजकीय आव्हाने उभी राहण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

दिवाळीच्या शुभेच्छांच्या निमित्ताने लागलेल्या या होर्डिंग्जने येवल्याच्या राजकारणात एक नवीन विषय चर्चेला आणला असून, हा केवळ सणाचा संदेश ठरणार की आगामी राजकीय भूकंपाची नांदी, हे आगामी काळच ठरवेल.

ऐतिहासिक वेतनवाढीच्या करारामुळे,

एसीसी सिमेंट आणि अंबुजा सिमेंट (अदानी ग्रुप) कंत्राटी, कामगारांची दिवाळी गोड

अक्षराज : वसंत वडस्कर

दि.०५, चंद्रपूर : जिल्ह्यातील सिमेंट उद्योगांमध्ये कार्यरत कंत्राटी, कामगारांसाठी आनंदाची बातमी असून, मागील सात महिन्यांपासून प्रलंबित असलेल्या वेतनवाढीच्या मागणी ा अखेर यश आले आहे. माजी खासदार तथा कामगार नेते नरेशबाबू पुगलिया यांच्या पुढाकाराने आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे झालेल्या ऐतिहासिक वेतनवाढीच्या करारामुळे हजारो कामगारांच्या जीवनात आर्थिक स्थैर्य निर्माण होण्यास मदत होणार आहे.

सन २०११ पासून सिमेंट कंपन्यांमध्ये कार्यरत कंत्राटी काम गारांची रोजंदारी अत्यल्प असल्यामुळे कामगारांना अनेक आर्थिक अजचणींचा सामना करावा लागत होता. ही परिस्थिती लक्षात घेऊन नरेशबाबू पुगलिया यांनी कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी पुढाकार घेत संबंधित सिमेंट कंपन्यांच्या व्यवस्थापनासोबत सातत्याने चर्चा सुरु ठेवली. कामगारांच्या हितासाठी दर तीन वर्षांनी वेतनवाढीचे करार करण्याची प्रक्रिया त्यांनी सुरु केली.

याशिवाय दरवर्षी मिळणारा दिवाळी बोनस, फेस्टिवल ॲडव्हान्स तसेच दिवाळी गिफ्ट व एक्यग्रेशिया यांचाही लाभ काम गारांना मिळणार आहे. या ऐतिहासिक करारामुळे व्यवस्थापनावर दरवर्षी अंदाजे ८.०२ केटी रुपयांच्या अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे. हा महत्वपूर्ण करार माजी खासदार नरेशबाबू पुगलिया षांच्या



अध्यक्षतेखाली, अदाणीचे सत्यनारायण दिगमरती, युनिट हेड राम बुवा (अंबुजा सिमेंट), एसीसी सिमेंटचे युनिट हेड लोकेश शीम ाली, अदाणी सिमेंटचे क्लस्टर हेड एच. आर. आनंद कुलकर्णी तसेच अंबुजा सिमेंटचे एच. आर. हेड संतोष कुलकर्णी यांच्या उपस्थितीत २२ ऑक्टोबर २०२६ रोजी करण्यात आला. गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद मिळाल्यामुळे सर्व कंत्राटी, कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. वाढत्या महागाईच्या काळात या वेतनवाढीमुळे कामगारांना मोठा आर्थिक आधार मिळणार असून त्यांच्या कुटुंबांनाही दिलासा मिळणार आहे. कामगारांच्या प्रश्नांना प्राधान्य देत त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी सातत्याने प्रयत्न करणारे म ाजी खासदार नरेशबाबू पुगलिया तसेच सकारात्मक भूमिका घेणारे कंपनी व्यवस्थापन यांचे कामगार आणि कामगार संघटनेच्या प्रतिनिधींनी मन: पूर्वक आभार व्यक्त केले आहेत.

१,९५० कामगारांना मिळणार वेतनवाढीचा लाभ

एसीसी सिमेंटमधील ७०० आणि अंबुजा सिमेंटमधील १,२५० अशा एकूण १,९५० कामगारांना या कराचा लाभ मिळणार आहे. १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०२९ या तीन वर्षाच्या कालावधीसाठी झाल्ल्या करारानुसार कामगारांच्या कार्यकुशलतेनुसार प्रतिदिन १२०, १२५ आणि १३० रुपये इतकी वेतनवाढ निश्चित करण्यात आली आहे.

प्रतिमहिना सरासरी ३,००० रुपयांचा अतिरिक्त लाभ !

या करारामुळे प्रत्येक पात्र कामगाराला सरासरी ३,००० रुपये प्रतिमहिना अतिरिक्त आर्थिक लाभ मिळणार आहे. विशेष म्हणजे, मागील सात महिन्यांची थकबाकीही कामगारांना देण्यात येणार असून, त्यापोटी एकूण सुमारे ८.०५ कोटी रुपयेच्या वर मि ळण्याचा अंदाज आहे. ही थकबाकी एकरकमी सर्व कामगारांच्या बँक खात्यात जमा करण्याबाबत २२ ऑक्टोबर २०२६ रेजी झालेल्या चर्चेनुसार वरील करार करण्यात आला आहे.

अवैध सावकारांवर आता थेट गुन्हे दाखल!

लातूर जिल्हाधिकाऱ्यांचा कठोर इशारा १४ छापे

दि.०५, लातूर : अवैध सावकारीविरोधात तातडीने गुन्हे दाखल करा, अन्यथा संबंधित अधिकाऱ्यांवरही कारवाई केली जाईल, असा कठोर इशारा जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी दिला आहे.



अवैध सावकारीच्या तक्रारींचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. छाप्यांमध्ये अवैध सावकारीशी संबंधित कागदपत्रे आढळल्यास संबंधितांवर त्वरित गुन्हे दाखल करावेत. परवाना नसताना सावकारी व्यवसाय करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, असे निर्देश त्यांनी दिले.

यापूर्वीच्या छाप्यांमध्ये तथ्य आढळलेल्या प्रकरणांमध्ये पुढील दोन दिवसांत गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले. प्रलंबित तक्रारींचा तातडीने निपटारा करावा, तसेच छाप्यांच्या कार्यवाहीचा तहसीलदारांनी आढावा घ्यावा, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

बैठकीला जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था विष्णू पोतंगले यांच्यासह तालुक्यांचे सहायक निबंधक उपस्थित होते.

१४ प्रकरणांत झडती, २ गुन्हे दाखल !

सहकार विभागाने आतापर्यंत जिल्ह्यात १४ प्रकरणांत झडती घेतली असून, त्यापैकी २ प्रकरणांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. उर्वरित प्रलंबित तक्रारींचा निपटारा करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.

अवैध सावकारीच्या गुन्ह्यांचा पोलिसांनी कालबद्ध पद्धतीने तपास करून पुढील कायदेशीर कार्यवाही वेगाने पूर्ण करावी, असे निर्देशही देण्यात आले.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी चंद्रपूर पोलिसांचे १८ लाखांचे योगदान

अक्षराज : वसंत वडस्कर

दि.०५, चंद्रपूर : राज्यात यावर्षी उद्भवलेल्या दुष्काळी परिस्थितीमुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्यासाठी चंद्रपूर जिल्हा पोलीस दलाने सामाजिक बांधिलकी जपत मुख्यमंत्री सहाय्यता निधीत १८ लाख १४६ रुपयांचे योगदान दिले आहे.



पोलीस दलातील अधिकारी, अंमलदार आणि मंत्रालयीन कर्मचाऱ्यांनी आपल्या एका दिवसाचे वेतन या निधीसाठी स्वच्छेने समर्पित केले. राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने १६ ऑक्टोबर २०२६ रोजी शासन परिपत्रक जारी करुन दुष्काळ निवारणार्थ राज्यातील सर्व शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना एक दिवसाचे वेतन देण्याचे आवाहन केले हेते. या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत चंद्रपूर पोलीस अधीक्षक कार्यालयासह जिल्हा पोलीस दलातील सर्व आस्थापनावरील अधिकारी, अंमलदार आणि मंत्रालयान कर्मचाऱ्यांनी पुढाकार धेतला.

ऑक्टोबर २०२६ च्या वेतनातून एक दिवसाचे वेतन कपात करुन एकूण १८ लाख १४६ रुपये मुख्यमंत्री सहायता निधीत जमा करण्यासाठी देण्यात आले आहेत.

दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या शेतकरी बांधवांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा चंद्रपूर जिल्हा पोलीस दलाचा हा प्रामाणिक प्रयत्न असून, सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेशही या उपक्रमातून देण्यात आला आहे.



महिलांच्या नजरेतून दुष्काळ

घरातले डबे रिकामे झाले, विहिरीतले पाणी आटले तर दुष्काळ म्हणायला पाहिजे,' अशी बीड जिल्ह्यातील महिलांनी दुष्काळाची व्याख्या केली. त्यांच्यासाठी पावसाची तूट किंवा पीक नुकसानीपेक्षा घरात धान्य, पिण्याचे पाणी, चारा आणि हाताला काम आहे का, हे महत्त्वाचे आहे. यंदा बाजरी न झाल्याने ती प्रतिक्विंटल चार ते साडेचार हजार रुपये दराने विकत घ्यावी लागते. रोजगार नसताना हा खर्च कसा करायचा, हा प्रश्न आहे. रेशनचे धान्यही पुरेसे, दर्जेदार नसते. खराब तांदूळ धुवून, वाळवून बाजरीत मिसळून दळावा लागतो. अनेक कुटुंबांचे रेशन बंद झाले आहे, तर मका न खाणाऱ्या भागांतही निकृष्ट मका दिला जात आहे.

कवडीमोल कष्ट!

यवतमाळ, परभणी आणि अकोला जिल्ह्यांत महिला शेतमजुरांची मजुरी यंदा निम्म्यावर आली आहे. कापूस वेचणीचा दर प्रतिकिलो दहा रुपयांवरून पाच रुपये झाला आहे. दुष्काळामुळे कापसाची झाडे खुरटी राहिल्याने वेचणीही कठीण झाली आहे. पूर्वी दिवसभरात ८० ते १०० किलो कापूस वेचणाऱ्या महिलांना आता केवळ ३० ते ४० किलो वेचता येतो. त्यामुळे दिवसाला मिळणारी मजुरी ८०० ते १००० वरून १५० ते २०० रुपयांवर आली आहे. रोजगार आणि उत्पन्न घटले तरी घरकाम व मुलांची काळजी घेण्याचे महिलांचे विनामोबदला श्रम कायम आहेत.

तमिळनाडूपर्यंत स्थलांतर

बीड जिल्ह्यातील अनेक कुटुंबांना रोजगारासाठी जून-जुलैपासूनच तमिळनाडूमध्ये ऊसतोडणीसाठी जावे लागले. पाण्याअभावी बांधकामासह स्थानिक रोजगारही बंद आहेत. मात्र, तमिळनाडूमधील उष्णता आणि हंगाम लवकर संपण्याची शक्यता लक्षात घेता तेथील उत्पन्नाचीही पुरेशी खात्री नाही. उत्पन्नासाठी सक्तीने गाव सोडावे लागल्यामुळे महिलांना कुटुंबाची काळजी, मुलांचे शिक्षण, आरोग्य व अन्नसुरक्षेचे प्रश्न आणि मागे राहणाऱ्या कर्ज व घरखर्चाचा भारही सोसावा लागतो.

रोजगार हरवले

दुष्काळामुळे तलाव आटल्याने मच्छिमारांचे उत्पन्न घटले आहे. वाढत्या तापमानामुळे माशांची संख्या कमी होत असून, महिलांसमोर कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवण्याचे आव्हान अधिक तीव्र झाले आहे. बीडमधील सुमनताईंच्या तेरा जणांच्या कुटुंबाला दरमहा कर्जाचे सात ते आठ हजार रुपये हप्ते भरावे लागतात. शेतीत उत्पन्न नाही, गावात काम नाही आणि घरातील धान्यही संपले आहे. ऑगस्टमध्ये त्यांनी दोन पिल्लांसह एक शेळी १८ हजार रुपयांना विकली. त्यातून दोन महिन्यांचे हप्ते आणि घरखर्च भागवला. महिलांसाठी शेळ्या ही गरजेच्या वेळी उपयोगी पडणारी बचत असते. ती विकल्याने भविष्यातील उत्पन्नाचा आधारही कमी होतो. दुष्काळात उत्पन्न थांबले तरी कर्जाचे हप्ते थांबत नाहीत. वाढता आर्थिक ताण, कर्जवसुली आणि स्थलांतर यांचा परिणाम महिलांच्या सुरक्षिततेवरही होतो. हिंसाचार आणि बालविवाहांच्या वाढत्या घटनांची चिंता लक्षात घेता दुष्काळ निवारणात महिलांचे आरोग्य, सुरक्षितता आणि मुलींचे शिक्षण यांनाही प्राधान्य देणे गरजेचे आहे.

कार्डांची जंत्री; पण हात रिकामे

'कार्ड काढण्यासाठी हजारो रुपये खर्च करायचे, ई-केवायसी करत राहायची; पण हक्काचं काहीच मिळत नाही,' असा संताप बीडमधील परिषदेत महिलांनी व्यक्त केला. रेशन, पीएम-किसान आणि लाडकी बहीण योजनेचे अनियमित लाभ, तसेच घोषित करूनही न मिळणारी रोख रक्कम यामुळे महिलांचा त्रास वाढला आहे. या कार्डांच्या जंजाळाविरोधात त्यांनी ओळखपत्रांची होळी करण्याचा निर्धार केला. या सगळ्या कार्डच्या जंत्रीमध्ये आता भर पडली आहे ती पाच हजार रुपये मिळवण्याची. शेतकऱ्यांचे नुकसान पाहता ही रक्कम अतिशय तुटपुंजी आहे.

- सीमा कुलकर्णी

धनत्रयोदशी : समृद्धी नेमकी कशात मोजायची?

धनत्रयोदशी आली की घराघरांत खरेदीची लगबग सुरू होते. सोने, चांदी, नवीन भांडी, वाहन, घरगुती उपकरणे आणि विविध वस्तू खरेदी करण्यासाठी बाजारपेठा सजतात. शुभमुहूर्तावर खरेदी करणे, घरात नवीन वस्तू आणणे आणि लक्ष्मीचे स्वागत करणे ही परंपरा अनेक वर्षांपासून चालत आली आहे. या परंपरेत आनंद आहे, श्रद्धा आहे आणि कुटुंबाच्या भविष्यासाठी काहीतरी चांगले करण्याची आकांक्षाही आहे.

मात्र, या निमित्ताने एक प्रश्न विचारावासा वाटतो. समृद्धी म्हणजे नेमके काय? आपल्या घरात किती वस्तू आहेत, बँकेत किती पैसे आहेत किंवा आपण किती महागड्या वस्तू खरेदी करू शकतो, यावर समृद्धी ठरते का? की आपल्या जीवनात आरोग्य, समाधान, सुरक्षितता, निसर्गसंपत्ती आणि सामाजिक सलोखा किती आहे, यावर तिचे खरे मोजमाप करायला हवे?

भारतीय संस्कृतीत धनाला महत्त्व दिले गेले आहे; परंतु धनाचा अर्थ केवळ नाणे किंवा संपत्ती एवढाच मर्यादित नाही. अन्नधान्य, पशुधन, भूमी, जलसंपदा, ज्ञान, आरोग्य, कौशल्य आणि कुटुंबातील आनंद हीदेखील समृद्धीचीच रूपे आहेत. पूर्वीच्या समाजजीवनात माणसाची श्रीमंती त्याच्या घरातील धान्यसाठा, जनावरे, शेती, कुटुंबाचे आरोग्य आणि समाजातील प्रतिष्ठा यांवरूनही ओळखली जात असे. आज आर्थिक प्रगतीचे निकष बदलले आहेत; पण जीवनासाठी आवश्यक असलेल्या या मूलभूत संपत्तीचे महत्त्व कमी झालेले नाही.

धनत्रयोदशीला भगवान धन्वंतरीच्या पूजनाची परंपराही आहे. आरोग्य आणि संपत्ती यांचा परस्परसंबंध या परंपरेतून अधोरेखित होतो. पैसा असला, महागडे घर असले आणि आधुनिक सुविधा असल्या, तरी आरोग्य नसेल तर त्या समृद्धीचा आनंद किती काळ घेता येईल? आरोग्य टिकवण्यासाठी स्वच्छ हवा, शुद्ध पाणी, पौष्टिक अन्न, पुरेशी झोप आणि निरोगी पर्यावरण आवश्यक आहे. यांपैकी कोणतीही गोष्ट केवळ पैशाने सहज निर्माण करता येत नाही. त्यासाठी निसर्गाची



साथ आणि आपल्या जीवनशैलीतील शिस्त आवश्यक असते.

आज आपण समृद्धीच्या मागे धावताना एक महत्त्वाची गोष्ट विसरत आहोत. आपल्या घरात येणारी प्रत्येक वस्तू कोणत्या ना कोणत्या संसाधनातून तयार होते. सोन्यासाठी खनिजे, वाहनांसाठी धातू आणि इंधन, इलेक्ट्रॉनिक उपकरणांसाठी विविध खनिजे, कपड्यांसाठी कापूस किंवा कृत्रिम तंतू, तर अन्नासाठी जमीन आणि पाणी लागते. या प्रत्येक वस्तूच्या निर्मितीमागे निसर्गातील संसाधनांचा वापर असतो. वस्तू खरेदी करताना आपण तिची किंमत मोजतो; पण तिच्या निर्मितीसाठी खर्च झालेल्या पाण्याचा, ऊर्जेचा, जमिनीचा आणि श्रमाचा विचार करतो का?

खरेदी करण्याचा आनंद नाकारण्याची गरज नाही. सणासुदीला घरासाठी नवीन वस्तू घेणे चुकीचे नाही. मात्र, गरज आणि आकर्षण यांतील फरक समजून घेणे आवश्यक आहे. एखादी वस्तू आपल्याला खरोखर आवश्यक आहे का? तिचा किती काळ उपयोग होणार आहे? तिची दुरुस्ती करता येईल का? ती वापरून झाल्यावर तिचे काय होणार आहे? असे प्रश्न खरेदीपूर्वी विचारले तर आपल्या उपभोगाच्या सवयी अधिक जबाबदार होऊ शकतात.

आपण अनेकदा संपत्ती निर्माण करण्यासाठी अधिकाधिक वस्तू जमा करतो; पण त्या वस्तूंची देखभाल, साठवण आणि विल्हेवाट यांचाही खर्च असतो. घरातील कपाटे भरलेली असतात, स्वयंपाकघरात अनेक उपकरणे असतात आणि वापरात नसलेल्या वस्तू जागा व्यापून राहतात. तरीही नवीन वस्तूंचे आकर्षण कमी होत नाही. ही गरज आहे की सवय, याचे आत्मपरीक्षण प्रत्येकाने करायला हवे.

निसर्गाने आपल्याला दिलेली संपत्ती मात्र मर्यादित आहे. पाण्याचा साठा, सुपीक माती, जंगलांचे क्षेत्र आणि जैवविविधता यांचे संवर्धन झाले नाही तर आर्थिक संपत्तीचा उपयोग किती काळ टिकणार? आपण पैसा साठवू शकतो; पण पाऊस निर्माण करू शकत नाही. पाण्याचा अपव्यय करून नंतर पैसे देऊन पाणी विकत घेता येईल; पण नष्ट झालेली नदी, प्रदूषित झालेला भूजलसाठा किंवा नष्ट झालेले जंगल पूर्ववत करण्यासाठी केवळ पैसा पुरेसा नसतो.

धनत्रयोदशीच्या दिवशी नवीन भांडे खरेदी करण्याची परंपरा आहे. त्या भांड्यात आपण कोणते अन्न शिजवणार आहोत, त्या अन्नाचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्याच्या श्रमांचा आपण किती आदर करतो आणि अन्न वाया जाणार नाही याची काळजी घेतो का, हे प्रश्नही महत्त्वाचे आहेत. अन्न हे केवळ बाजारातून विकत घेतलेले उत्पादन नाही. त्यामागे जमीन, पाणी, सूर्यप्रकाश, शेतकऱ्याचे श्रम आणि निसर्गातील असंख्य घटकांचे योगदान असते.

खरी समृद्धी म्हणजे स्वतःकडे भरपूर असणे एवढेच नव्हे; तर इतरांच्या मूलभूत गरजांचाही विचार करण्याची क्षमता असणे. आपल्या घरात अन्नाची रेलचेल असताना शेजारी उपाशी राहू नये, आपल्याकडे पुस्तके असताना एखाद्या विद्यार्थ्याला शिक्षणासाठी पुस्तक मिळावे, आपल्या परिसरात हिरवाई असताना इतरांनाही स्वच्छ पर्यावरणाचा लाभ मिळावा, हीदेखील समृद्धीचीच लक्षणे आहेत.

धनत्रयोदशीला लक्ष्मीचे स्वागत करताना आपण आपल्या घरातील संपत्तीचीच नव्हे, तर निसर्गाने दिलेल्या संपत्तीचीही जाणीव ठेवूया. आपल्या गरजा पूर्ण करताना इतरांच्या गरजांवर अतिक्रमण होणार नाही, पुढील पिढ्यांसाठी संसाधने शिल्लक राहतील आणि आपल्या समृद्धीचा लाभ समाजालाही मिळेल, अशी जीवनपद्धती स्वीकारूया.

कारण संपत्तीचे खरे मूल्य ती किती आहे यात नसते; तर तिचा उपयोग किती सुज्ञपणे, किती जबाबदारीने आणि किती जणांच्या कल्याणासाठी होतो, यात असते.

या धनत्रयोदशीला स्वतःला एक प्रश्न विचारूया आपण घरात किती धन आणत आहोत, यापेक्षा आपल्या जगण्यात किती समृद्धी निर्माण करीत आहोत?

- विजयकुमार कट्टी
मो.७९७७५१३८२२

धनत्रयोदशी



आश्विन वद्य त्रयोदशी
म्हणेतया धनत्रयोदशी
लक्ष्मीस मानूनि आई
पूजन करी या दिवशी

देवतांचा वैद्य धन्वंतरी
जयंती ती या दिवशी
सुआरोग्य लाभो सर्वां
अमृतअसे त्या कलशी

कणीकदीप तेरा लावी
तोंड करावे दक्षिणेशी
यम दीप दाना महत्त्व
अपमृत्यू न ये कुणासी

मुहूर्ता असे मान खूप
व्यापारी पाहे रोजनिशी
किती सुख किती दु:ख
तपासतो तो जमा राशी

इप्सित ती लाभो खुशी
आनंद मिळे सकळाशी
निमित्ताने दिपावलीच्या
शुभेच्छांच्या बरसे राशी

सण आहे निमित्तमात्र
माणूस हो एकजिनसी
धर्म अर्थ शास्त्र सांगड
भले असूद्या भिन्न मुशी

अंतर्बाह्य शुचिर्भूत व्हा
झाडूपावन लक्ष्मीजशी
प्रसन्नचित्त होईलं कुबेर
भरभरू देईल धनराशी

- हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६

दानाचे महत्व सांगणारी 'धनत्रयोदशी'

धनत्रयोदशीच्या दिवशी सोने विकत घेण्याचा प्रघात पूर्वापार चालत आला आहे. मागील २-३ वर्षांपासून सोन्याचे भाव गगनाला भिडले असतानाही धनत्रयोदशीच्या मुहूर्तावर सोने विकत घेणाऱ्यांमध्ये मात्र कमतरता आलेली नाही. या दिवशी सोने विकत घेतल्याम ुळे वर्षभर धनलक्ष्मी आपल्या घरात वास करते असा समज आहे. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी वर्षभराचा जमाखर्च द्यायचा असतो. पूर्वी धनत्रयोदशीपर्यंत शिल्लक राहिलेले धन धार्मिक आणि सत्कार्यात व्यय केले जात असे त्यामुळे दान करणाऱ्याच्या घरात नेहमीच धनलक्ष्मी लक्ष्मीरुपाने वास करत असे. अर्थात कमावलेले धन कोणाकडून ओरबाडून घेतलेले किंवा अन्य कोणाच्या कष्टाचे नसावे. स्वतः मेहेनत करून कमावलेले धनच फलद्रुप होते. पूर्वीचे राजे वर्षाच्या शेवटी आपला खजिना सत्पात्रे दान करून रिता करायचे. मंदिरांना, आश्रमांना, गुरुकुलांना, गोशाळांना आणि गरजवंतांना ते धन दान करायचे. या दानातून त्यांना अलौकिक समाधान मिळायचे. यामुळे जनता आणि राजा यांच्यातील संबंध हे कौटुंबिक स्वरूपाचे होते. राजाचा खजिना हा जनतेचा असून राजा त्याचा केवळ सांभाळ करणारा विश्वस्त आहे ही भावना त्यावेळी राजांमध्ये असे. त्यामुळे जनता कर देतांना आडकाठी न करता स्वतःहून तो राजदरबारी देत असे. त्यामुळे साहजिकच पुन्हा खजिना भरत असे. पूर्वीचे राजे हे सात्विक प्रवृत्तीचे आणि प्रजाहितदक्ष असत त्यामुळे राज्यात कधी स्वार्थ बोकाळत नसे. पूर्वीच्या राजांची तुलना आताच्या राजकारण्यांशी केल्यास आताचे बहुतांश राजकारणी हे केवळ स्वतःच्या आणि स्वतःच्या कुटुंबाच्या हिताला प्राधान्य देणारे असतात. जनतेची सेवा करण्यासाठी म्हणून निवडणूक लढवायची आणि निवडून आल्यावर मात्र त्याच जनतेकडे सोयीस्करपणे पाठ करायची. सत्तेची खुर्ची आली कि तिचा उपयोग आपली तिजोरी भरण्यासाठी करायचा. निवडणुकीत व्यय केलेला पैसा दहापटीने वसूल करायचा. जोपर्यंत खुर्ची आहे तोपर्यंत आपल्या पुढच्या कित्येक पिढ्या बसून खातील इतके धन गोळा करायचे. जनतेला स्वधन देणे सोडा पण विविध योजनांतून जनतेला सरकारी तिजोरीतून मिळणाऱ्या धनावर सुद्धा यांचा डोळा असतो. माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांनी देशातील भ्रष्टाचारावर भाष्य करताना म्हटले होते 'सामान्य लोकांच्या योजनांसाठी दिल्लीतून निघालेल्या १०० रुपयांपैकी सामान्य लोकांपर्यंत केवळ १० रुपयेच पोहोचतात.' उरलेले ९० रुपये स्वार्थांध राजकारणी आणि प्रशासकीय अधिकारी लाटतात. निवडणूक जवळ आली कि महिनाभर मतदार नागरिकांच्या हातापाया पडायचे, पैसे, भेटवस्तू, खाद्य आणि मदिरा यांच्या मोबदल्यात त्यांचे मत आपल्या पदरी पाडायचे आणि उरलेले ४ वर्ष ११ महिने सत्तेचा मलिदा लाटायचा. धनतेरस खऱ्या अर्थाने स्वार्थापासून, धनाच्या लालसेपासून दूर राहण्याची शिकवण देते. ही शिकवण पूर्वीचे राजे आचरणात आणत असत त्यामुळे भारतीय संस्कृतीचे गोडवे आजही जगभरात गायले जातात. आज अनेकांचे आयुष्य पैसा कमावण्यात आणि त्यांचा संचय करण्यात व्यय होते. उतारवयात जेव्हा शरीर साथ देईनासे होते तेव्हा आयुष्यात दानधर्म, पुण्यकर्म न केल्याचा पश्चाताप होतो. धनतेरस आपल्याला धनाचा संचय करण्याचा नव्हे तर सन्मार्गाने कमावलेले धन सत्कार्यात व्यय करण्याची शिकवण देते. ज्याप्रमाणे ज्ञान इतरांना दिल्याने वाढते त्याप्रमाणे सत्पात्रे दान केल्यास घरात लक्ष्मीचा वास चिरंतर राहतो. यंदा धनत्रयोदशी साजरी करताना त्यामागील अर्थ समजून घेऊन ती साजरी करूया !

– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई
संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०

धनत्रयोदशीच्या निमित्ताने.... आयुर्वेदाची कास धरा !

कार्तिक कृष्ण त्रयोदशीला आयुर्वेदाचे जनक भगवान धन्वंतरी समुद्रमंथनातून अमृत कलश घेऊन प्रकट झाले. त्यांनी देवांना अमृत देऊन अमर केले. धनत्रयोदशीच्या दिवशी दीर्घायुष्य आणि आरोग्य लाभण्यासाठी धन्वंतरी देवतेची पूजा केली जाते.

निरोगी व्यक्तीच्या आरोग्याचे रक्षण करणे आणि आणि रोग झालाच तर त्यावर उपाय करणे यासाठी आयुर्वेदाचे प्रयोजन करण्यात आलेले आहे. प्रत्येक व्यक्तीने न्यूनतम १०० वर्षे जगावे असे आयुर्वेद सांगतो आणि हे निरोगी जीवन जगण्यासाठी काय पथ्य पाणी पाळावे, आहार विहार कसा असावा, ऋतुमानानुसार त्यात कोणता बदल करावा याची शिकवण आयुर्वेद आपल्याला देतो. याचाच अर्थ रोगावर उपचार करण्यापेक्षा रोग होऊच नये यासाठी आयुर्वेद महत्वाचा मानला जातो. आजमितीला आजारांवर आणि रोगांवर मात करण्यासाठी जगभरात अनेक थेरपी अस्तित्वात आहेत; मात्र आयुर्वेदाला हजारो वर्षांचा इतिहास आहे.

भारतभूमी ही आयुर्वेदाची जननी आहे. प्राचीन ऋषीमुनींनी या क्षेत्रात वारेमाप संशोधन केलेले आहे. या संशोधनाचा आधार आजही आधुनिक शास्त्रज्ञ घेत असतात. आयुर्वेदिक उपचार वेळकाढू असले तरी ते अधिक परिणाम कारक आणि शरीरस्वास्थावर कोणताही विपरीत परिणाम करणारे नसल्यामुळे आज आयुर्वेदिक उपचारांना जगभरातून मागणी आहे. कोरोनाच्या काळात आयुर्वेदाचे महत्व जागतिक आरोग्य संघटनेनेही मान्य केले होते. भारतीयांवर आयुर्वेदिक उपचारांचा प्रभाव अधिक असल्यामुळे लोकसंख्येच्या बाबतीत इतर देशांच्या तुलनेत भारतीय लोकसंख्येची घनता अधिक असूनही कोरोनाने मृत पावणाऱ्या भारतीयांची संख्या तुलनेने कमी होती.

आयुर्वेदाचा दैनंदिन जीवनात अवलंब केल्याने माणसाचे आरोग्य सुखी, निरोगी आणि आनंदी होऊ शकते यासाठी भारतीयांनी आयुर्वेदाची कास धरावी !

– नरेश घरत, चेंबूर

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

थोडक्यात बातम्या

खापरखेडा परिसरातील समस्या व विकासात्मक प्रश्नांवर पत्रकारांशी चर्चा



अक्षराज : दिवाकर घेर

दि.०५, नागपूर : खापरखेडा औष्णिक वीज केंद्राच्या परिसरातील विविध प्रलंबित प्रश्न, नागरिकांच्या समस्या आणि विकासकामांसंदर्भात पत्रकार व वीज केंद्र प्रशासन यांच्यात मह त्त्वपूर्ण चर्चा झाली. वीज केंद्राच्या सौदामिनी कार्यालयात मुख्य अभियंता डॉ. भूषण शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी पत्रकारांच्या शिष्टमंडळाने खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रातून दररोज निघणाऱ्या काळा/पांढऱ्या राखेमुळे मोठ्या प्रमाणात होणाऱ्या प्रदूषणाचा प्रश्न तात्काळ निकाली काढण्यासह महानिर्मितीच्या सामाजिक बांधिलकी (सी.एस.आर.) या निधीतून परिसरातील गावात विकासात्मक कामे करण्यात यावे तसेच विविध ज्वलंत समस्या तसेच नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिल्या. मांडण्यात आलेल्या प्रत्येक विषयाची मुख्य अभियंता डॉ.शिंदे यांनी गांभीर्याने दखल घेतली. संबंधित विभागांशी समन्वय साधून समस्यांचे निराकरण करण्यासाठी आवश्यक पावले उचलली जातील, तसेच प्रलंबित प्रश्न प्राधान्याने मार्गी लावण्यात येतील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

याप्रसंगी पत्रकारांच्या वतीने मुख्य अभियंता डॉ. भूषण शिंदे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. पत्रकार आणि प्रशासन यांच्यात नियमित संवाद राहिल्यास स्थानिक प्रश्न सोडविण्यास मदत होईल, असा सूरही यावेळी व्यक्त करण्यात आला.

बैठकीला उपमुख्य अभियंता(प्रशासक) नितीन रोकडे आणि कामगार कल्याण अधिकारी आनंद वाघमारे यांची विशेष उपस्थिती होती. याप्रसंगी पत्रकार दिवाकर घेर, अमर जैन, ओमप्रकाश साद, सुनील जालंदर, दिलीप गजभिये, कपिल वानखेडे, मनोज डेविड, राजेश खंडारे, सुधीर फेंडर, अभय मिश्रा, मयूर तिरपुडे, विनोद गोडबोले, केशव पानतावणे, विक्की थापा, श्रीराम सातपुते आदी पत्रकार प्रामुख्याने उपस्थित होते.

राज्यस्तरीय योग शिक्षक संमेलन; 'महायोगोत्सव २०२६'चे आयोजन

अक्षराज : जाफर शेख

दि.०५, बोरी (परभणी) : योगा फाउंडेशन, महाराष्ट्र संचालित महाराष्ट्र योगशिक्षक संघाचे सहावे राज्यस्तरीय योगशिक्षक संमेलन 'महायोगोत्सव २०२६' हे दि. १४ व १५ नोव्हेंबर २०२६ रोजी धुळे येथील श्री स्वामीनारायण मंदिरात महाराष्ट्र योगशिक्षक संघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ.मनोज निलपवार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनात परभणी जिल्ह्यातील योग शिक्षकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे; असे आवाहन संघटनेचे राज्य सचिव गजानन चौधरी व जिल्हा अध्यक्ष चंद्रकांत देशमुख यांनी केले आहे.

या संमेलना दरम्यान विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत. तसेच योगासन स्पर्धा, निबंध स्पर्धा, शोधनिबंध सादरीकरण, लेखांचे प्रकाशन आणि सांस्कृतिक कार्यक्रम अशा विविध उपक्रमांची रेलचेल असणार आहे. संमेलनाचे विशेष आकर्षण म्हणजे 'योगानुभूती – ६' या स्मरणिकेचे प्रकाशन होय. या स्मरणिकेमध्ये योगक्षेत्रातील विविध लेख, अनुभव आणि विचारांना स्थान देण्यात आले असून ती संमेलनात सहभागी होणाऱ्या योगसाधकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या राज्यस्तरीय संमेलनात महाराष्ट्रातील सर्व योगशिक्षक, योगसाधक व योगप्रेमींनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र योगशिक्षक संघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. मनोज निलपवार, राज्य कार्यकारी अध्यक्ष डॉ. कुणाल महाजन,नियोजन समितीचे अध्यक्ष प्रसाद कुलकर्णी,योगा फाउंडेशनचे सचिव अर्जुन शिंदे, राज्य सचिव सुपर्णा पाल, गजानन चौधरी, धुळे जिल्हाध्यक्ष मनीषा चौधरी, कोषाध्यक्ष संतोष खरटमोल, योग क्रीडा समिती प्रमुख राहुल येवला, तसेच उत्तर महाराष्ट्र विभाग प्रमुख सुनील गुरव, विश्वनाथ सोमवंशी, संदीप कुलकर्णी, चंद्रकांत देशमुख व इतर पदाधिकाऱ्यांनी केले आहे.महाराष्ट्रातील योगशिक्षकांना एकत्र आणणे, त्यांच्यात संघटनात्मक एकजूट निर्माण करणे, योग शिक्षकांच्या समस्या व प्रश्नांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे तसेच योग विद्येचा राज्यभर प्रसार व प्रचार करणे, हा या संमेलनाचा मुख्य उद्देश असल्याचे संस्थापक अध्यक्ष डॉ. मनोज निलपवार यांनी सांगितले.

मुंबई शहरात रंगला आट्यापाट्याचा डाव..!



अक्षराज : प्रतिनिधी

दि.०५, मुंबई : इंटरनेट व मोबाईलच्या जमान्यामध्ये जिथे मुले अगदी लहान वयापासूनच ऑनलाईन गेम खेळतात, तिथेच रखरखत्या ऊन्हात व मातीच्या धुराळ्यात मुंबई शहरातील शालेय विद्यार्थी शिवकालीन खेळ असलेल्या आट्यापाट्या खेळामध्ये तल्लीन होतात, ही विशेष बाब आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, मुंबई शहर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने जिल्हास्तरीय आट्यापाट्यांच्या स्पर्धा वडाळा येथील डॉ.आंबेडकर कॉमर्स कॉलेजच्या मैदानावर आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेचे उद्घाटन डॉ.आंबेडकर कॉलेजच्या प्राचार्या डॉ.यशोधरा वराळे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. १४ वर्षाखालील मुलगे मुली आणि १७ व १९ वर्षाखालील मुलगे व मुलीसाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेसाठी मुंबई शहर विभागातील ३६ संघानी सहभाग नोंदवला होता. वरळी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मनपा इंग्रजी शाळा, सिताराम मिल कंपाऊंड शाळा, ना.म.जोशी मार्ग मुंबई पब्लिक शाळा, शिंदेवाडी मुंबई पब्लिक शाळा, जी.डी.सोमानी इंटरनॅशनल स्कूल, वाडीबंदर मुंबई पब्लिक शाळा अशा नामांकित शाळांमधील विद्यार्थ्यांच्या आट्यापाट्या संघाने या स्पर्धेत सहभाग घेतला होता.

या स्पर्धेत ना.म.जोशी मार्ग मुंबई पब्लिक स्कूलच्या १४ वर्षाखालील मुलांचा प्रथम क्रमांक मिळवून विभागीय स्तरावर पात्र ठरला आहे. तर सिताराम मिल कंपाऊंड मुंबई पब्लिक स्कूलच्या १७ वर्षाखालील मुलांचा संघ प्रथम क्रमांकाने विभागीय स्तरासाठी पात्र ठरला आहे.याच स्पर्धेमध्ये वरळी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मनपा इंग्रजी शाळेच्या मुलींचा संघ द्वितीय क्रमांकाने उपविजेता ठरला असून सिताराम मिल कंपाऊंड मुंबई पब्लिक स्कूलच्या मुलींचा संघ प्रथम क्रमांकाने विभागीय स्तरावर खेळण्यासाठी पात्र झाला आहे.

या स्पर्धेचे आयोजन व उत्तम नियोजन जिल्हा क्रीडा अधिकारी नीलिमा अडसुळ यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडाधिकारी तथा खेळ प्रमुख अनिल घुगे यांनी व्यवस्थित पार पाडले. डॉ. आंबेडकर कॉलेजचे क्रीडा संचालक श्री जयदास जाधव यांनीही या स्पर्धेसाठी आवश्यक ती सर्व मदत केली. राज्यस्तरीय आट्यापाट्या पंच ठाणे जिल्हा असोसिएशनचे प्रमुख मिलिंद धंबा यांनी आणि त्यांच्या टीम ने उत्तम पंचकार्य केले.

यावेळी बृहन्मुंबई महानगर पालिका शारीरिक शिक्षण विभागाचे कनिष्ठ पर्यवेक्षक चंद्रकांत घोडेराव, शारीरिक शिक्षण शिक्षक प्रभाकर हजारे, रश्मी राणे यांच्यासह अनिल गगनमल्ले, प्रथमेश, हर्षदा सपकाळ, स्नेहल टीचर यांची विशेष उपस्थिती होती.

धनेगाव येथे १० नोव्हेंबर ला महाबैठक; पाणी हक्कासाठी व्यापक जनलढा उभारण्याचे आवाहन

कृष्णा खोऱ्याचे २१ टीएमसी पाणी उजणीमार्गे मांजरा धरणात आणण्यासाठी दिवाळी पाडव्याला जल एल्गार



अक्षराज : शिवाजी औसेकर

दि.०५, केज (बीड) : मराठवाड्यातील दुष्काळी भागाचा पाणीप्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी कृष्णा खोऱ्यातील पाणी उजणी धरण मार्ग मांजरा धरणात आणण्याच्या मागणीला आता व्यापक जनलढ्याचे स्वरूप देण्याची तयारी सुरू झाली आहे.

यंदा अत्यल्प पावसामुळे बीड, धाराशिव आणि लातूर जिल्ह्यांतील तलाव, पाझर तलाव, विहिरींसह अनेक जलस्रोत कोरडे पडले आहेत. त्यामुळे शेतीच्या सिंचनासोबतच नागरिक आणि पशुधनाच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

या पार्श्वभूमीवर उजणी धरणातून मांजरा प्रकल्पासाठी २१ टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्याच्या मागणीसाठी दिवाळी पाडव्याच्या मुहूर्तावर मंगळवार, दि. १० नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता मांजरा धरण विश्राम गृहासमोर, धनेगाव कॅम्प (ता.केज) येथे महाबैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

मांजरा धरणाच्या पाण्यावर केज, कळंब, अंबाजोगाई, लातूर आणि रेणापूर या पाच तालुक्यांतील नागरिकांची पिण्याच्या पाण्याची गरज भागते, तर सुमारे २० हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येते. मात्र, पावसाची अनियमितता, पावसातील मोठे खंड आणि घटणारा जलसाठा यामुळे या भागातील शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न दरवर्षी गंभीर होतो. मागील अनेक पिढ्यांनी दुष्काळाचे चटके सोसले आहेत. पुढील पिढीलाही पाण्यासाठी वणवण करावी लागू नये, यासाठी पावसावर अवलंबून न राहता पाण्याचा कायमस्वरूपी पर्याय निर्माण करण्याची गरज आहे.

कृष्णा खोऱ्यातील पाणी मराठवाड्याकडे वळविण्याबाबत यापूर्वीही राज्य सरकारने नियोजन केले आहे. २००५ मध्ये कृष्णा-भीमा स्थिरीकरण योजनेअंतर्गत मराठवाड्यासाठी पाणी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. पुढे या नियोजनात सुधारणा करून २३.६६ टीएमसी पाण्याची तरतूद करण्यात आली.

मात्र, या योजनेची पूर्ण अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. त्यामुळे जुन्या नियोजनाची अंमलबजावणी करण्यासह उजणीमार्गे मांजरा धरणासाठी २१ टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्याच्या मागणीवर शासनाने ठोस निर्णय घ्यावा, अशी भूमिका या चळवळीच्या माध्यमातून मांडण्यात येणार आहे.

राजकीय मतभेद बाजूला ठेवून पाणी हक्कासाठी एकजूट

पाण्याचा प्रश्न कोणत्याही एका पक्षाचा, संघटनेचा किंवा व्यक्तीचा नसून परिसरातील शेतकरी आणि नागरिकांच्या भवितव्याशी संबंधित आहे. त्यामुळे सर्व राजकीय पक्षांचे नेते, आजी-माजी लोकप्रतिनिधी आणि पदाधिकाऱ्यांनी पक्षीय मतभेद व वैयक्तिक महत्त्वाकांक्षा बाजूला ठेवून एकत्र यावे. सामाजिक कार्यकर्ते, शेतकरी संघटना, व्यापारी, व्यावसायिक आणि सामान्य नागरिकांनी ही या लढ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन निमंत्रकांनी केले आहे.

या महाबैठकीत कृष्णा खोरेच पाणी उजणी धरणातून बीड, लातूर व धाराशिव जिल्ह्यांसाठी २१ टीएमसी पाणी कालव्याद्वारे उपलब्ध करून देण्यास तातडीने मंजुरी देणे, मांजरा धरणाची उंची ०.५ मीटरने वाढल्यामुळे बाधित झालेल्या बुडीत क्षेत्रातील जमीनधारकांना मोबदला देणे सह अन्य मागण्यांवर चर्चा होणार आहे. तसेच शासनाकडे सामूहिक पाठपुरावा आणि पुढील आंदोलनाची दिशा निश्चित केली जाणार आहे.

या महाबैठकीस सर्वपक्षीय राजकीय नेते, आजी-माजी लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, शेतकरी, व्यापारी, व्यावसायिक, पत्रकार आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन निमंत्रक कुलदीप करपे, राहुल खोडसे, बब्रुवान अण्णा कणसे, सतीश भाऊ शिंदे, अरविंद मोरे, दिलीप लोंढे, बाबुराव लोकरे, प्रदीप काळे, अरुण पवार, केशव नाना ढगे तसेच मांजरा धरण परिसरातील केज, अंबाजोगाई, धारूर, लातूर, रेणापूर व कळंब तालुक्यांतील शेतकऱ्यांनी केले आहे.

लोकमान्य टिळक कन्या विद्यालयात 'दीपोत्सव २०२६' उत्साहात साजरा

प्रदूषणमुक्त व पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचा विद्यार्थिनींना संदेश



अक्षराज : वसंत वडस्कर

दि.०५, चंद्रपूर : लोकमान्य टिळक स्मारक मंडळ, चंद्रपूर द्वारा संचालितलोकमान्य टिळक कन्या विद्यालय, चंद्रपूर येथे दिवाळीनिमित्त 'दीपोत्सव २०२६' हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्यामुख्याध्यापिका प्रांजली महादाणीहोत्या. तसेच विद्यालयाचे पर्यवेक्षक दीपक गावंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी दिवाळीचे सांस्कृतिक आणि धार्मिक महत्त्व विशद करताना विद्यालयातील शिक्षिका पनके मॅडम यांनी विद्यार्थिनींना दिवाळीच्या सहा दिवसांची माहिती दिली. वसुबारस, धनत्रयोदशी, नरकचतुर्दशी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा आणि भाऊबीज या प्रत्येक दिवसाचे महत्त्व, त्यामागील परंपरा आणि सांस्कृतिक मूल्ये त्यांनी विद्यार्थिनींना सोप्या व सुंदर शब्दांत समजावून सांगितली. यानंतर विद्यालयाचे पर्यवेक्षक दीपक गावंडे यांनी विद्यार्थिनींना प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी करण्याचे आवाहन केले. फटाक्यांमुळे होणारे वायुप्रदूषण, ध्वनिप्रदूषण तसेच मानवी आरोग्यावर होणारे दुष्परिणाम याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. आनंदाचा सण साजरा करताना पर्यावरणाचे आणि आपल्या आरोग्याचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मनोगतात विद्यालयाच्या मुख्याध्यापिका प्रांजली महादाणी यांनी विद्यार्थिनींशी मनमोकळेपणाने हितगुज साधले आणि त्यांना दिवाळीच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. दिवाळी हा केवळ स्वतःच्या आनंदाचा सण नसून इतरांच्या जीवनातही आनंदाचा प्रकाश निर्माण करण्याचा सण आहे, असे त्यांनी सांगितले. ज्या गरीब आणि गरजू कुटुंबांना आर्थिक परिस्थितीमुळे दिवाळीचा आनंद घेता येत नाही, अशा व्यक्ती व मुलांना शक्य तेवढी मदत करून त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवावे. आपल्या आनंदात इतरांनाही सहभागी करून घ्यावे, माणुसकी आणि सामाजिक बांधिलकी जपावी, असा मोलाचा संदेश त्यांनी विद्यार्थिनींना दिला. तसेच पर्यावरणपूरक आणि प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी करण्याचे आवाहनही केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन स.शिक्षक गोन्नाडे सर यांनी केले. त्यांनी उपस्थित मान्यवर, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद आणि विद्यार्थिनींचे आभार मानले तसेच सर्वांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थिनींना प्रदूषणमुक्त व पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याची सामूहिक शपथ देण्यात आली. अशा प्रकारे ज्ञान, संस्कार, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देणारा 'दीपोत्सव २०२६' हा कार्यक्रम आनंददायी वातावरणात संपन्न झाला.

पालकमंत्री जाधव-पाटील यांनी मंत्रालयातून बुलढाणा जिल्ह्याच्या दुष्काळ, पीक पाणी आणि उपाययोजनाबाबत दूरदृश्य प्रणालीद्वारे घेतला आढावा



अक्षराज : प्रतिनिधी

दि.०५, बुलढाणा : बुलढाणा जिल्ह्यातील संभाव्य दुष्काळी परिस्थितीचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी प्रशासनातील सर्व विभागांनी समन्वयाने आणि जबाबदारीने काम करावे. शासनाच्या माध्यमातून देण्यात येणारी आर्थिक मदत, सवलती आणि योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत तत्परतेने पोहोचवावा.

तसेच पशुधनासाठी चारा, नागरिकांसाठी पिण्याचे पाणी आणि शिल्लक पाण्याचे सिंचनासाठी नियोजन करावे, असे निर्देश मदत व पुनर्वसन मंत्री तथा पालकमंत्री मकरद जाधव-पाटील यांनी दिले.

मदत व पुनर्वसन मंत्री जाधव-पाटील यांनी मंत्रालयातून बुलढाणा जिल्ह्याच्या दुष्काळ, पीक पाणी आणि उपाययोजनाबाबत दूरदृश्य प्रणालीद्वारे आढावा घेतला. यावेळी वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव, आमदार श्वेता महाले, सिद्धार्थ खरात, मनोज कायंदे, संजय गायकवाड, जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे, मुख्य कार्यकारी अधिकारी भालचंद्र चव्हाण, कृषी अधिकारी, जलसंपदाचे अधिकारी दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

बैठकीत शेतकरी कर्जमाफीच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. जिल्ह्यात आतापर्यंत १ लाख ५९ हजार २५६ शेतकऱ्यांना १४६३ कोटी रूपये कर्जमाफीचा लाभ देण्यात आला असून उर्वरित पात्र शेतकऱ्यांची प्रक्रिया गतीने पूर्ण करावीत. कोणताही पात्र शेतकरी कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहणार नाही, याची संबंधित विभागांनी दक्षता घ्यावी.

दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांवर आर्थिक संकट वाढू नये, यासाठी दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये कोणत्याही प्रकारची सक्तीची वसुली बँकांनी करू नये, शिवाय कर्जवाटपाचे काम गतीने करावे, असेही निर्देश ही मंत्री जाधव पाटील यांनी दिले.बुलढाणा जिल्ह्यात सध्या ४ लाख ६१ हजार मेट्रीक टन चारा उत्पादन होणार असून हा चारा जानेवारीपर्यंत पुरेल. संभाव्य चारा टंचाई टाळण्यासाठी पशुसंवर्धन आणि कृषी विभागाने नियोजन करावे. शेतकऱ्यांना चारा लागवड आणि चारा उत्पादनासाठी प्रोत्साहित करावे. तसेच वनक्षेत्रात वणवे लागू नयेत, यासाठी वन विभागाने प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवाव्यात.

सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय ठेवून काम करण्याचे निर्देशही मंत्री जाधव पाटील यांनी दिले.

बुलढाणा जिल्ह्यात दुष्काळाची स्थिती बिकट आहे. धरणातील पाण्याचा वापर पिण्यासाठी करावा. पाण्याचे योग्य नियोजन करण्याच्या सूचना मंत्री सावकारे यांनी दिल्या

वरसई दूरक्षेत्र पोलीस चौकीचे पोलीस उपविभागीय अधिकारी जालिंदर नालकुल यांच्या हस्ते उद्घाटन

४० गावे आणि ४३ आदिवासी वाड्यांना मोठा दिलासा



अक्षराज : मितेश जाधव

दि.०५, पेण (रायगड) : पेण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पेण पूर्व भागातील वरसई दूरक्षेत्र पोलीस चौकीचे उद्घाटन गुरुवार, दि.०५ नोव्हेंबर २०२६ रोजी रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपविभागीय अधिकारी जालिंदर नालकुल यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी पेण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भोसले, वडखळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष जाधव आणि दादर सागरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रमेश गर्जे यांची प्रमुख उपस्थिती होती. वरसई येथे दूरक्षेत्र पोलीस चौकी सुरू झाल्याने पेण पूर्व भागातील ग्रामीण तसेच आदिवासी वाड्यांमधील नागरिकांना मोठा दिलासा मिळला. यापूर्वी या भागातील नागरिकांना कोणतीही तक्रार दाखल करायची असल्यास अथवा पोलिसांशी संबंधित कामासाठी पेण शहरातील पोलीस ठाण्यात जावे लागत होते. त्यामुळे नागरिकांचा वेळ आणि पैसा खर्च होत होता. मात्र, आता वरसई येथेच पोलीस चौकी सुरू झाल्याने नागरिकांना पोलिसांशी संपर्क साधणे अधिक सोयीचे आहे असून परिसरातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासही मदत होणार आहे.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल म्हणाले की, वरसई दूरक्षेत्र पोलीस चौकीच्या कार्यक्षेत्रात जवळपास ४० गावे आणि ४३ आदिवासी वाड्यांचा समावेश आहे. एवढ्या मोठ्या ग्रामीण आणि आदिवासी भागातील नागरिकांना यापूर्वी प्रत्येक वेळी पेण शहरात जावे लागत होते. ही गैरसोय लक्षात घेऊन वरसई येथे दूरक्षेत्र पोलीस चौकी सुरू करण्यात आली आहे. ही चौकी २४ तास जनतेच्या सेवेत कार्यरत राहणार असून, नागरिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी पोलीस प्रशासन सदैव तत्पर राहील, असे त्यांनी सांगितले.

यावेळी पेण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भोसले यांनीही मनोगत व्यक्त केले. वरसई दूरक्षेत्र पोलीस चौकी उभारण्यासाठी पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि वरसई विभागातील स्थानिक नागरिकांनी एकत्रितपणे मेहनत घेतली. नागरिकांच्या सहकार्यामुळेच ही पोलीस चौकी प्रत्यक्षात साकार होऊ शकली, असे सांगत त्यांनी वरसई विभागातील सर्व नागरिकांचे आभार मानले.

ही पोलीस चौकी उभारण्यासाठी पेण पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक भोईर, भूपेंद्र वेळे, रामेश्वर अकमवार तसेच वरसई विभागातील सामाजिक कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिकांनी विशेष परिश्रम घेतले.

या उद्घाटन सोहळ्याला पोलीस उपविभागीय अधिकारी जालिंदर नालकुल, पेण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भोसले, वडखळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष जाधव, दादर सागरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रमेश गर्जे, पोलीस उपनिरीक्षक विक्रम नवरखेडे, पोलीस उपनिरीक्षक वेंगुर्लेकर, रायगड जिल्हा परिषद सदस्य जनार्दन भस्मा, ताई जोमा दरवडा, आदिवासी समाजाचे अध्यक्ष जोमा दरवडा, वाकरूळचे सरपंच गणेश गायकर, वरसईच्या सरपंच वैशाली जाधव, सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत होजगे, माजी पंचायत समिती सदस्य नीलकंठ दिवेकर यांच्यासह पोलीस कर्मचारी, पोलीस पाटील, ग्रामस्थ आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वरसई येथे सुरू झालेली ही दूरक्षेत्र पोलीस चौकी केवळ पोलीस प्रशासनाची सुविधा नसून, पेण पूर्व भागातील ग्रामीण आणि आदिवासी जनतेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे.

ठाणे मध्यवर्ती कारागृहातील 'दिवाळी मेळावा २०२६' उत्साहात संपन्न

जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते कैद्यांच्या कलाकृतींचे प्रदर्शन खुले

अक्षराज : जे.के.पोळ

दि.०५, ठाणे : दिवाळी सणाचे औचित्य साधून महाराष्ट्र शासन कारागृह विभागांतर्गत ठाणे मध्यवर्ती कारागृहात आयोजित करण्यात आलेल्या 'दिवाळी मेळावा – कारागृह निर्मित वस्तू प्रदर्शन व विक्री २०२६' चे उद्घाटन ठाणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या शुभहस्ते अत्यंत उत्साहात संपन्न झाले.

या विशेष कार्यक्रमास कारागृह अधीक्षक राणी राजाराम भोसले आणि इतर सहकारी अधिकारी देखील उपस्थित होते. कारागृहातील कारखाना विभाग, सुतारकाम, यंत्रमाग, शिवणकाम आणि बेकरी विभागातील बंद्यांनी आपल्या कौशलयातून व मेहनतीतून ही उत्पादने तयार केली आहेत.यंदाच्या प्रदर्शनाचे सर्वात मोठे आणि नाविन्यपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे, प्रत्येक उत्पादनावर एक क्यूआर कोड (QR Code) लावण्यात आला आहे. हा क्यूआर कोड स्कॅन केल्यावर संबंधित वस्तूची प्रत्यक्ष निर्मिती कैद्यांनी कशी केली, याचा व्हिडिओ मोबाईलवर पाहता येतो. महाराष्ट्रात प्रथमच ठाणे कारागृहाने हा अनोखा उपक्रम सुरू केला असून, याद्वारे नागरिकांना कारागृहातील प्रशासकीय कामाची आणि उपक्रमांची माहिती मिळत आहे.कारागृहातील सुतारकाम विभागातून सागाच्या लाकडापासून बनवलेली सुबक बैलगाडी, लाकडी फर्निचर, आकर्षक मंदिर आणि विविध गृहसजावटीच्या वस्तू तयार करण्यात आल्या आहेत. बाजारात सागाच्या लाकडापासून तयार केलेल्या अशा वस्तूंची किंमत ३ ते ४ हजार रुपयांपर्यंत असते; मात्र कारागृहाच्या या प्रदर्शनात त्या वस्तू अवघ्या बाराशे ते पंधराशे रुपयांपर्यंत अत्यंत वाजवी दरात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. सर्व वस्तूंच्या आकारमानानुसार व तयार करण्याच्या पद्धतीनुसार त्यांचे दर निश्चित करून त्यावर लेबल चिटकवण्यात आले आहेत. याशिवाय बेकरी विभागात ओट्स बिस्किट्स, नाचणी बिस्किट्स यांसह विविध पौष्टिक आणि चवदार खाद्यपदार्थ बनवले गेले आहेत. महिला व इतर बंद्यांनी अत्यंत सुबक पणत्या, पर्यावरणपूरक पिशव्या, रंगीबेरंगी आकाशदिवे (आकाश कंदील), पर्स, सुती कापडाचे व कॉटनचे प्रॉडक्ट्स, टॉवेल तसेच आकर्षक की-चेन आणि की-स्टँड यांसारख्या विविध भेटवस्तू बनवल्या आहेत.कारागृह प्रशासनाचा मुख्य उद्देश नफा मिळवणे नसून बंद्यांना प्रशिक्षित करणे आणि त्यांच्यात सकारात्मक मानसिक परिवर्तन घडवून आणणे हा आहे. ठाणे मध्यवर्ती कारागृहात सध्या सुमारे ३ हजार ५०० बंदी कार्यरत आहेत. या कारागृहातील कारखाना विभागात सुमारे १०० बंदी, शिवणकाम व इतर विभागांत साधारण शंभराच्या आसपास बंदी, तर महिला विभागातील सुमारे १० महिला बंद्यांना विशेष प्रशिक्षण देऊन त्यांच्याकडून या वस्तू बनवून घेतल्या जातात. बंद्यांना त्यांच्या कामाच्या स्वरूपानुसार नियमानुसार वेतन (वेजेस) दिले जाते. कारागृहातून बाहेर पडल्यानंतर बंद्यांनी स्वतःचा व्यवसाय स्वतः सुरू करावा किंवा काम करून पैसे मिळवावेत आणि गुन्हेगारीकडे परत वळू नयेत, हा यामागे मूळ उद्देश आहे. जिल्हा नियोजन निधीतून कैद्यांच्या कौशल्य विकासासाठी आणि उपकरणांच्या खरेदीसाठी आवश्यक ते साहाय्यही पुरवले जात आहे.हे विशेष प्रदर्शन दिवाळी होईपर्यंत सकाळी ९.०० ते संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत नागरिकांसाठी खुले राहणार आहे. तसेच दिवाळी प्रदर्शनाव्यतिरिक्त कारागृहाच्या बाहेरील आऊटलेटमध्ये वर्षभर कोणालाही येऊन ऑर्डर देऊन खरेदी करता येऊ शकते.ठाण्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी या प्रदर्शनास भेट देऊन बंद्यांच्या कलागुणांना, कौशल्याला आणि स्वावलंबनाच्या प्रयत्नांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन कारागृहाच्या वतीने करण्यात आले आहे.

आ. जोरगेवार यांच्या मागणीची मंत्रालयात दखल

सफाई कुली आणि सफाई रेजा यांनाही सफाई कामगारांचा दर्जा देण्याचे निर्देश

अक्षराज : वसंत वडस्कर

दि.०५, चंद्रपूर : चंद्रपूर महानगरपालिकेतील सफाई कामगारांच्या वारसांना वारसा हक्क तत्त्वावर नियुक्ती देण्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आ. किशोर जोरगेवार यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळताना दिसत आहे. त्यांच्या मागणीची दखल घेत मुंबई मंत्रालयात लाड-पागे समितीच्या शिफारशी आणि सफाई कामगारांच्या वारसा हक्क नियुक्ती संदर्भात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

या बैठकीत नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी चंद्रपूर महानगरपालिकेतील १४७ वारसांना नियुक्ती देण्याची प्रक्रिया राबविण्याचे निर्देश दिले. यावेळी आ. किशोर जोरगेवार, शिक्षक मतदार संघाचे आमदार सुधाकर अडबाले, नगर विकास विभागाच्या उपसचिव मंजुषा कारंडे, सामाजिक न्याय विभागाच्या उपसचिव वर्षा देशमूख, सामान्य न्याय विभागाच्या अव्वर सचिव श्रुती तोडसकर, कक्ष अधिकारी करंगूरकर, मुख्याधिकारी माधूरी सलामे, मनपा उपायुक्त शेषराव टाले, डिएमए चे उपायुक्त रोहिदास दोरकुटकर, सूरज घडसे, ॲड. राजेश कूसरे आदींची उपस्थिती होती.

या बैठकीत सफाई कामगारांच्या वारसा हक्क नियुक्तीच्या प्रक्रियेत येणाऱ्या विविध अडचणी आणि प्रलंबित प्रकरणांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. विशेषतः सफाई कुली आणि सफाई रेजा या पदांवर कार्यरत असलेल्या कर्मचार्यांच्या वारसांना नियुक्ती देताना निर्माण होणाऱ्या तांत्रिक अडचणी आ. किशोर जोरगेवार यांनी निदर्शनास आणून दिल्या. लाड-पागे समितीच्या शिफारशी तसेच सामाजिक न्याय व विशेष



सहाय्य विभागाच्या २४ फेब्रुवारी २०२३ च्या शासन निर्णयातील तरतुदींनुसार सफाई कुली आणि सफाई रेजा ही पदे सफाई कामगारांच्या समकक्ष मानून संबंधित कर्मचाऱ्यांच्या वारसांनाही वारसा हक्क नियुक्तीचा लाभ देण्यात यावा, अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली.

याची दखल घेत राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सफाई कुली आणि सफाई रेजा यांना सफाई काम गारांच्या समकक्ष धरून त्यांची सफाई कामगारांमध्ये गणना करण्याचे निर्देश दिले. तसेच प्रत्यक्ष वारसांनी सादर केलेल्या अर्जांच्या आधारे पात्र वारसांची तत्काळ यादी तयार करून पदभरतीची प्रक्रिया राबविण्याचे स्पष्ट निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

यासोबतच मंजूर आकृतिबंधातील पदांची मर्यादा, रिक्त पदे आणि आस्थापना खर्चाच्या अटींचा आधार घेऊन वारसा हक्क नियुक्तीची प्रकरणे प्रलंबित ठेवू नयेत, हा मुद्दाही बैठकीत मांडण्यात आला. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या २४ फेब्रुवारी २०२३ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार सफाई कामगारांच्या वारसा हक्क नियुक्तीच्या प्रकरणांमध्ये आकृतिबंध आणि आस्थापना खर्चाच्या मर्यादेची अट लागू नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. तसेच वित्त विभागाचे पदभरती निर्बंधही अशा प्रकरणांना लागू नसल्याची तरतूद आहे.

१२ ऑगस्ट १९७५ ते २३ फेब्रुवारी २०२३ या कालावधीतील प्रलंबित प्रकरणांचाही यावेळी मुद्दा उपस्थित करण्यात आला. १३ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार संबंधित कालावधीतील प्रलंबित प्रकरणांना २४ फेब्रुवारी २०२३ च्या शासन निर्णयातील सुधारित तरतुदी लागू करण्याची बाब निदर्शनास आणून देण्यात आली. त्याचप्रमाणे २८ जानेवारी २०२५ च्या शासन परिपत्रकातील तरतुदींनुसार घाणीकाम करणाऱ्या सफाई कामगारांच्या वारसांना नियुक्ती देण्याबाबतही चर्चा झाली. वारसांची शैक्षणिक पात्रता लक्षात घेऊन त्यांना योग्य पदावर नियुक्ती देण्याचा मुद्दाही आ.किशोर जोरगेवार यांनी मांडला. वारसाची इच्छा असल्यास त्याच्या शैक्षणिक पात्रतेनुसार गट-कमधील लिपिक, स्वच्छता निरीक्षक, स्थापत्य अभियांत्रिकी किंवा विद्युत विभागातील पदांवर नियुक्ती देण्याची तरतूद असल्याकडे लक्ष वेधण्यात आले.

चंद्रपूर महानगरपालिकेतील सफाई कामगारांच्या कुटुंबांना न्याय मिळावा आणि अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला वारसा हक्क नियुक्तीचा प्रश्न मार्गी लागावा, यासाठी आ. किशोर जोरगेवार यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे या बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णयात्मक निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे १४७ वारसांच्या नियुक्ती प्रक्रियेला गती मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून, संबंधित पात्र वारसांना लवकरच दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

थोडक्यात बातम्या

सावनेर तालुक्यातील टंचाईग्रस्त गावांना जिल्हा परिषद व प्रशासकीय अधिकाऱ्यांची थेट भेट

कोठोडी, येरणगाव, मंगसा येथे उपाययोजनांचा घेतला आढावा



अक्षराज : दिवाकर घेर

दि.०५, नागपूर : सावनेर पंचायत समिती अंतर्गत टंचाईग्रस्त गावांच्या यादीत समाविष्ट असलेल्या मौजा कोठोडी, येरणगाव आणि मंगसा या गावांना बुधवार दिनांक ४ नोव्हेंबर २०२६ रोजी नागपूर जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी कमलकिशोर फुटाणे यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांसह प्रत्यक्ष भेट दिली. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर निर्माण होणाऱ्या पाणीटंचाईवर मात करण्यासाठी व नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेण्यासाठी या दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या संयुक्त दौऱ्यात अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी कमलकिशोर फुटाणे यांच्यासह सावनेरचे गटविकास अधिकारी ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे उपविभागीय अभियंता, सेक्शनल इंजिनिअर व कनिष्ठ अभियंता लघु पाटबंधारे विभागाचे उपविभागीय अभियंता तसेच भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेचे अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.दौऱ्यादरम्यान कोठोडी, येरणगाव व मंगसा या तिन्ही गावांमध्ये प्रत्यक्ष पाहणी करून ग्रामस्थांच्या पाणीविषयक अडचणी समजून घेण्यात आल्या. यावेळी संबंधित गावांचे सरपंच, ग्रामपंचायत सचिव व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. गावात उद्भवणाऱ्या संभाव्य टंचाईवर मात करण्यासाठी तात्काळ व दीर्घकालीन काय उपाययोजना करता येतील यावर सविस्तर चर्चा झाली.याप्रसंगी मार्गदर्शन करताना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी फुटाणे यांनी स्पष्ट निर्देश दिले की, टंचाई निवारणासाठी पाणी योजनांचे रखडलेले दुरुस्तीचे काम तातडीने पूर्ण करावे, पाण्याचे उपलब्ध स्रोत बळकट करावेत आणि आवश्यकतेनुसार योग्य त्या तांत्रिक उपाययोजना युद्धपातळीवर राबवाव्यात, जेणेकरून एकाही नागरिकाला पाण्यासाठी भटकंती करावी लागणार नाही. प्रशासनाच्या या थेट भेटीमुळे ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले असून नियोजित कामांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

उन्हाळी शेती संकटात; नदी-नाल्यांद्वारे पाणी सोडण्याची शेतकऱ्यांची मागणी



अक्षराज : सुनिल फर्डे

दि.०५, शहापूर (ठाणे) : अल निनोच्या संभाव्य प्रभावासह हवामान बदलामुळे यंदा पर्जन्यमानात लक्षणीय घट झाल्याने जलाशयांमधील पाणी साठ्यावर परिणाम झाला आहे. उपलब्ध पाणीसाठ्याचे नियोजन करताना शासनाच्या निर्देशानुसार पिण्याच्या पाण्याची उपलब्धता ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत सुरक्षित राहील, याची दक्षता घेण्याचे तसेच उपलब्ध पाणीसाठ्यापैकी १० टक्के पाणी आपत्कालीन परिस्थितीसाठी राखीव ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मात्र, या नियोजनामुळे जलाशयातून नदी, नाले व कालव्यांमार्फत उन्हाळी हंगामात शेतीसाठी पाणी सोडणे शक्य होणार नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. परिणामी, परिसरातील शेतकऱ्यांसमोर भाजीपाला लागवड व उन्हाळी शेती करण्याचे मोठे संकट उभे राहिले आहे. शेतीला पाणी मिळाले नाही तर शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे.या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते नितीन रामचंद्र देसले यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने उपविभागीय अधिकारी श्रद्धा धुमाळ यांची भेट घेऊन त्यांना निवेदन सादर केले. जलाशयातील उपलब्ध पाणीसाठ्याचा विचार करून पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देतानाच शेतीसाठीही योग्य पाणी नियोजन करावे, नदी व नाल्यांमार्फत नियंत्रित पद्धतीने पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली.यावेळी धनाजी वामन देसले, अशोक देसले, काशिनाथ देसले, शांताराम बर्डे, धनाजी बर्डे, प्रकाश बर्डे, नरेश देसले, सावळाराम दळवी, गिरीश कामत, अमोल देसले, प्रवीण देसले, दत्तात्रय देसले, दीपक साबळे, स्वप्नील बर्डे, चंद्रकांत देसले, राजा देसले, रामचंद्र देसले, प्रकाश भेरे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या समस्या व मागण्यांची दखल घेत उपविभागीय अधिकारी श्रद्धा धुमाळ यांनी सकारात्मक भूमिका घेतली. शेतकऱ्यांच्या मागण्यांचा विचार करून संबंधित समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे आश्वासन त्यांनी दिले. तसेच दिवाळीनंतर शेतकरी व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेऊन पाणी नियोजनाबाबत कायमस्वरूपी उपाययोजना करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.पिण्याच्या पाण्याची सुरक्षितता राखतानाच शेतकऱ्यांच्या शेतीच्या पाण्याचा प्रश्न ही मार्गी लागावा, अशी अपेक्षा आता परिसरातील शेतकरी व्यक्त करीत आहेत. दिवाळीनंतर होणाऱ्या बैठकीतून या प्रश्नावर ठोस तोडगा निघणार का, याकडे सर्व शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी चंद्रपूर पोलिसांचे १८ लाखांचे योगदान



अक्षराज : वसंत वडस्कर

दि. ०५ चंद्रपूर : राज्यात यावर्षी उद्भवलेल्या दुष्काळी परिस्थितीमुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्यासाठी चंद्रपूर जिल्हा पोलीस दलाने सामाजिक बांधिलकी जपत मुख्यमंत्री सहाय्यता निधीत १८ लाख १४६ रुपयांचे योगदान दिले आहे. पोलीस दलातील अधिकारी, अंमलदार आणि मंत्रालयीन कर्मचाऱ्यांनी आपल्या एका दिवसाचे वेतन या निधीसाठी स्वच्छेने समर्पित केले. राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने १६ ऑक्टोबर २०२६ रोजी शासन परिपत्रक जारी करुन दुष्काळ निवारणार्थ राज्यातील सर्व शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना एक दिवसाचे वेतन देण्याचे आवाहन केले हेते. या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत चंद्रपूर पोलीस अधीक्षक कार्यालयासह जिल्हा पोलीस दलातील सर्व आस्थापनावरील अधिकारी, अंमलदार आणि मंत्रालयान कर्मचाऱ्यांनी पुढाकार धेतला. ऑक्टोबर २०२६ च्या वेतनातून एक दिवसाचे वेतन कपात करुन एकूण १८ लाख १४६ रुपये मुख्यमंत्री सहायता निधीत जमा करण्यासाठी देण्यात आले आहेत. दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या शेतकरी बांधवांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा चंद्रपूर जिल्हा पोलीस दलाचा हा प्रामाणिक प्रयत्न असून, सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेशही या उपक्रमातून देण्यात आला आहे.